दै. जनता पत्र दि 22.10.25

# गांजाची तस्करी करणाऱ्या दोन आरोपी अटक

## पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांची कामगिरी

लोहा,(ता.प्र.)-पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व अवैध धंदे बंद व्हावे यासाठी मोहीम उघडले असून त्याच उद्देशाने जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांना आदेशित करून जिल्ह्यातील अवैध धंदे बंद व्हावेत यासाठी प्रयत्न चालविले आहेत त्याचाच एक भाग म्हणून लोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी धावरी परिसरात गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून तपास पथकाची स्थापना करून राज पत्रित अधिकारी नायब तहसीलदार पाठक यांच्या मदतीने धावरी परिसरात गांजाची तस्करी करण्याच्या उद्देशाने मोटरसायकल वरून येणारेकुविख्यात गांजा तस्कर ललित सत्यनारायण शर्मा राहणार बसवेश्वर नगर जुना कवठा नांदेड व दीपक गौतम कांबळे या दोघांना मुद्देमाला सह अटक करून त्यांच्या जवळील गांजा नायब तहसीलदार पाठक यांच्या समक्ष जप्त करून आरोपीला जेरबंद करून अटक केली आहे यामध्ये पल्सर मोटरसायकल आठ किलो २५५ ग्रॅम गांजा असा एकूण एक लाख चार हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे याप्रकरणी गुन्हा रजिस्टर नंबर ३३६ ऑब्लिक २०२५ कलम आठ सी २० ब ११ सी २९ एन डी पी एस अ‍ॅक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे तसेच दुसऱ्या एका प्रकरणात बेरळी येथील साऊंड सिस्टीम चे दुकान फोडून डीजे पळविणारी टोळी देखील पोलीस निरीक्षक आयलाने यांनी जेरबंद केली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने गस्त घालत असताना बेरळीयेथे दोन अनोळखी इसम आढळून आले त्यावेळी त्यांची विचारपूस केली असता आम्ही डीजे साऊंड चे काम करणार आहोत असे सांगून त्यांनी सुरज कांबळे यास फोन लावून दिल्यावरून मी डीजे चा मालक बोलत असून ही दोन मुले आमचे पान ७ वर